**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२६**

-----------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०२६ / फाल्गुन २९, १९४७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) शालेय शिक्षण मंत्री**<br>**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**<br>**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(७) वस्त्रोद्योग मंत्री**<br>**(८) सहकार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

-------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २९**

-------------------------------

**शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) मधील आरक्षित प्रवर्गाच्या पात्रता निकषाबाबत**

**(१) * ३१४८० श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) मध्ये आरक्षित प्रवर्गासाठी (एससी/एसटी/व्हीजेएनटी/ओबीसी/एसबीसी) पात्रतेचा निकष मागील वर्षी ८२ गुण होता मात्र चालू वर्षात ८३ गुणांचा निकष लागू केल्यामुळे ८२ गुण प्राप्त केलेले उमेदवार अपात्र ठरविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परीक्षेमधील काही प्रश्न संदिग्ध, चुकीचे अथवा उत्तरांचे पर्याय चुकीचे असल्याबाबत परीक्षार्थींकडून मोठया प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अशा चुकीच्या प्रश्नांचे गुण सर्व परीक्षार्थींना देणे किंवा संबंधित प्रश्न रद्द करून विद्यार्थ्यांना न्याय देण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त परिक्षेत ८२ गुण प्राप्त केलेल्या आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना दिलासा देण्याबाबत तसेच संबंधित विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी नियमात आवश्यक बदल करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) आरक्षित प्रवर्गाकरीता शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये ५५ टक्के गुण प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यानुसार १५० पैकी ८२.५० गुण प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यामुळे गुणांचे रुपातर पूर्णांकात केल्यास ८३ गुण होतात. तथापि, ८२ गुणांची टक्केवारी ५४.६७ टक्के होत असून ही टक्केवारी ५४.५० टक्के पेक्षा जास्त असल्याने सन २०१३ च्या शिक्षक पात्रता परीक्षेपासून ८२ गुण प्राप्त होणाऱ्या उमेदवारांस उत्तीर्ण ठरविण्यात आलेले आहे.

त्यानुसार सन २०२५ च्या परीक्षेमध्ये एक प्रश्न विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन रद्द झाल्याने काही उमेदवारांचे ८२ वरुन ८१ गुण झाले. एकूण टक्केवारी विचारात घेता ५४.३६ टक्के झाल्याने सदरची टक्केवारी ५४.५० पेक्षा कमी अल्यामुळे सदर उमेदवार अपात्र ठरविण्यात आले आहेत.

(२) व (३) होय हे खरे आहे.

(४) उमेदवारांना प्रश्न रद्द करावा लागल्यास अचूक प्रश्नांच्या गुणांवर पात्रता निश्चित करण्यात येईल याबाबतची सूचना उमेदवारांना देण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेवर नमूद केलेली होती. त्यानुसार आधीच विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन निकालाबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यामुळे पात्रता निकषाबाबतची बाब उमेदवारांना आधीच ज्ञात असल्याने, विहीत कार्यपध्दतीनुसार अपात्र झालेल्या उमेदवारांकरीता नियमात बदल करणे नियमोचित होणार नाही.

तसेच, रद्द केलेल्या प्रश्नामुळे ८२ वरुन ८१ गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली असून, सदरचे प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत

**(२) * ३१८७९ श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासनमान्य सार्वजनिक वाचनालयांना मिळणारे अनुदान तुटपुंजे असून त्यामुळे संबंधित वाचनालयांना विविध आर्थिक व प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनमान्य सार्वजनिक वाचनालयांच्या अडचणी दूर करणे, अनुदानात वाढ करणे तसेच सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात वाढीव तरतूद करण्याबाबत सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघातर्फे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये तसेच तत्पूर्वी अनेक वेळा शासनाकडे निवेदने सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) राज्यात ११९५५ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम, १९७० मधील तरतूदींनुसार शासनमान्यता प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांनी मागील वर्षी केलेल्या खर्चापैकी मान्य बाबींवर केलेल्या खर्चाच्या ९० टक्के वा त्या ग्रंथालयाच्या दर्जा/ वर्गासाठी अनुज्ञेय असलेल्या अनुदानाच्या कमाल मर्यादेइतके यापैकी जे कमी असेल तितके परिरक्षण अनुदान प्रतिवर्षी देण्यात येते.

ग्रंथालयांना देण्यात येणारे सहाय्यक अनुदान हे ग्रंथालयाने केलेल्या अनुज्ञेय खर्चावर आधारीत असून सदर अनुदानातून ग्रंथालय व्यवस्थापनाला वेतन व वेतनेतर खर्च करणे बंधनकारक आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर, २०२२ अन्वये सन २०२२-२३ मध्ये तत्कालिन अनुदान दरामध्ये ६० टक्के इतकी वाढ करण्यात आली आहे. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदान दरात ४० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनोर (जि.पालघर) जवळील टेण येथील जे. कुमार कंपनीच्या प्रकल्पामुळे वैतरणा नदीचे पाणी दुषित होत असल्याबात

**(३) * ३१६८१ श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ वर मनोर (जि.पालघर) परिसरातील टेण गावाला लागून वैतरणा नदी काठाला जे. कुमार कंपनीचे प्रकल्प सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी विविध कामांसाठी लागणारे सिमेंट काँक्रीटचे स्ट्रक्चर बनविले जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामांसाठी वापरण्यात आलेल्या सिमेंटचे पाणी नदीत मिसळत असल्याने नदी प्रदूषित होत असून तेच पाणी पुढे नदी काठच्या गावातील ग्रामस्थ पिण्यासाठी वापरत असून त्यामुळे त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकारणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नदीचे पाणी प्रदूषित करणाऱ्या जे. कुमार कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर प्रकल्पाचे दिनांक २८.१०.२०२५ रोजी पाहणी केली असून सदर पाहणी दरम्यान सदर प्रकल्पात वापरण्यात आलेल्या सिमेंटचे पाणी काही प्रमाणात स्थानिक नाल्यामध्ये जाऊन वैतरणा नदीच्या खाऱ्या पाण्याच्या क्षेत्रामध्ये मिसळत असल्याचे आढळून आले. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगास दिनांक ३०.१०.२०२५ रोजी संमतीपत्रातील अटी व शर्तींचे अनुपालन करण्यामध्ये त्रुटी आढळल्यामुळे कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तद्नंतर दिनांक ०६.०२.२०२६ रोजी करण्यात आलेल्या तपासणी दरम्यान वापरण्यात आलेले सिमेंट मिश्रीत सांडपाणी वैतरणा नदीच्या खाऱ्या पाण्याच्या क्षेत्रामध्ये जात नसल्याचे आढळूल आले.

सदर प्रकल्प मुंबई अहमदाबाद महामार्गाच्या पश्चिम दिशेमध्ये वैतरणा नदीच्या काठावर अस्तित्वात आहे. महामार्गापासून खालच्या बाजूस नदीचे खारे पाणी क्षेत्र असल्यामुळे वैतरणा नदीचे पाणी वैतरणा नदी काठच्या गावातील ग्रामस्थांव्दारे पिण्यासाठी वापरण्यात येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सरकारी शाळांमधील भौतिक सुविधांच्या अभावाबाबत

**(४) * ३११७९ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यू-डायस प्लस २०२५-२६ च्या अहवालानुसार महाराष्ट्रातील सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थी संख्या एका वर्षात १ लाख २८ हजार २०९ ने घटल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एकूण ९ हजार २६६ शाळा सध्या 'एकशिक्षकी' असून त्यापैकी ८ हजार ५८६ शाळा या केवळ सरकारी व्यवस्थापनाच्या आहेत व परिणामी काही शाळा बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील ३ हजार ३२८ शाळांमध्ये अद्याप वीज जोडणी उपलब्ध नसल्याची तसेच अनेक शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सातारा, पुणे, सिंधुदुर्ग व बुलढाणा या जिल्ह्यांतील काही शाळांमध्ये चालू शैक्षणिक वर्षात 'शून्य प्रवेश' (Zero Admissions) झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सरकारी शाळांची घटती विद्यार्थी संख्या रोखण्यासाठी, आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व 'एकशिक्षकी' शाळांचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांकरीता नियमित शिक्षक नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी कंत्राटी तत्वावर शिक्षक नेमण्याची मूभा आहे. कंत्राटी शिक्षकाची यू-डायस प्लस पोर्टलवर नोंद होत नसल्याने एकशिक्षकी शाळांची संख्या अधिक दिसत आहे.

(३) राज्यातील २९९० शाळांमध्ये विद्युत सुविधा, ६८३ शाळांमध्ये मुलींचे स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध सुविधा नसून सर्व शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे. माहे मार्च अखेर सर्व शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांवरील रिक्त पदांवर सेवानिवृत्त, कंत्राटी स्वरूपात शिक्षकांची नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत नेमणूक करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सर्व शाळांमध्ये मुलींकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध करण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद व आयुक्त यांना सूचना निर्गमित करण्यात आलेली आहेत.

जिल्हा नियोजन समिती, मनरेगा, सेस निधी, क्रीडा विभाग निधी, स्थानिक विकास निधी, सेवाभावी संस्था, समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, सिएसआर, गौणखनिज, लोकसहभाग, जलजीवन मिशन, १४ वा / १५ वा वित्त आयोग इत्यादी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजनांद्वारे कार्यान्वित उपाययोजनांचा शासकीय, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील स्थानिक गरजानुसार अपेक्षित पायाभूत सुविधांच्या विकासाकरीता दिनांक १६.०४.२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सूचना देण्यात आल्या आहे.

-----------------

## परळी वैजनाथ (जि.बीड) तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रातील अनियमिततेबाबत

**(५) * ३१६३३ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी वैजनाथ (जि. बीड) तालुक्यातील यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचे अधिकृत परीक्षा केंद्र हे एका रहिवासी इमारतीत दर्शविण्यात आले असून प्रत्यक्ष परीक्षा विनापरवाना ग्रामीण भागातील शारदा विद्यामंदिर, जिरेवाडी येथे घेण्यात आल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाला स्वतःची आवश्यक भौतिक सुविधा (इमारत, वर्गखोल्या, मैदान इ.) उपलब्ध नसतानाही मान्यता देऊन परीक्षा केंद्र निश्चित करण्यापूर्वी संबंधित शिक्षण विस्तार अधिकारी/गटशिक्षणाधिकारी यांनी आवश्यक स्थळ तपासणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमानुसार परीक्षा केंद्र बदलण्यास पूर्वपरवानगी आवश्यक असताना शिक्षण विभागाची मान्यता न घेता संबंधित केंद्र शहरी भागातून ग्रामीण भागात हलविण्यात आला असून या संदर्भात शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सदर अनियमिततेमुळे संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सामूहिक कॉपीस प्रोत्साहन देणे, नियमभंग व कर्तव्यातील कसूर असणाऱ्या संबंधित संस्थाचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य व अधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सदर कनिष्ठ महाविद्यालयात भौतिक सुविधा उपलब्ध नसल्याचे गटशिक्षणाधिकारी यांना तपासणी दरम्यान निदर्शनास आले आहे.

(३) संबंधित केंद्र बदलताना सदर कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडून आवश्यक परवानगी घेतल्याचे दिसूत येत नाही, तसेच सदरचे परीक्षा केंद्राचे स्थलांतरण जवळच्याच दुसऱ्या परीक्षा केंद्रावर केल्याचे आढळून आले आहे व या दोन केंद्रातील अंतर ६०० मीटर आहे.

शिक्षणाधिकारी, बीड यांच्याकडे अशा परीक्षा केंद्र स्थलांतरणाचा कोणताही प्रस्ताव सादर करण्यात आला नव्हता.

(४) हे खरे नाही.

शाळेमध्ये अतिरिक्त वर्ग खोल्या नसल्यामुळे परीक्षेकरिता विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था कनिष्ठ महाविद्यालयात झाली नाही. तथापी सदर शाळेत नियमित शाळांचे वर्ग सुरु आहेत.

(५) सदर प्रकरणात चौकशी करीता गटशिक्षणाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती यांनी स्थापन करण्यात आली आहे.

त्यानुसार शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद, बीड यांनी यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, श्री.अतुल दुबे यांना निलंबित करण्याबाबत दिनांक ०६.०३.२०२६ चे पत्रान्वये संस्थेला कळविलेले आहे. तसेच या प्रकरणांचे गांर्भीय लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय परळी (वै.) ता.परळी

(वै.), जि.बीड यांचे भौतिक सुविधा, केंद्र मान्यता, इ. प्रशासकीय बाबींची सखोल तपासणी करण्यासाठी जिल्हा स्तरावर देखील चौकशी समिती गठित करण्यात आलेली आहे.

तसेच पुढील वर्षापासून सदर परीक्षा केंद्राची मान्यता रद्द करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वरोरा (जि.चंद्रपूर) येथील तेजस्विनी महिला नागरी सहकारी पतसंस्थेतील गैरव्यवहाराबाबत**

**(६) * २३२३१ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथील तेजस्विनी महिला नागरी सहकारी पतसंस्थेत सन २०१४-१५ ते २०२१-२२ या कालावधीत संस्था चालकांकडून सुमारे २१ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब दिनांक १४ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गंभीर प्रकरणी वरोरा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली असतानाही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

सदर पतसंस्थेबाबत तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे विशेष लेखापरीक्षक वर्ग-२, अंतर्गत जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचेकडून सन २०१४-१५ ते २०२१-२२ या कालावधीचे चाचणी लेखापरीक्षण करण्यात आले आहे. तथापि, सदर लेखापरीक्षणात संस्था चालकांकडून सुमारे २१ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब निर्देशनास आलेली नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

पतसंस्थेच्या ठेवीदारांनी त्यांच्या ठेवी परत न मिळाल्यामुळे मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिके प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक १३.११.२०२५ रोजी दिलेल्या आदेशान्वये विशेष लेखापरीक्षक यांनी विनिर्दिष्ट अहवाल सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.वरोरा यांना सादर केला आहे. त्याआधारे प्रस्तुत संस्था अडचणीत येवून ठेवीदारांच्या ठेवी अडकून पडण्यामागे जबाबदार असलेल्या संस्थेच्या संचालक मंडळातील २१ सदस्यांविरूद्ध पोलीस स्टेशन, वरोरा येथे फौजदारी गुन्हा क्र.०१५/२०२६, दिनांक १२.०१.२०२६ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांचेकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**प्राथमिक शिक्षकांना शिक्षक पात्रता परिक्षा अनिवार्य केल्याबाबत**

**(७) * २९२९१ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे ऑगस्ट, २०१० पूर्वी नियुक्त केलेल्या इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानंतर शासनाकडून अद्याप स्पष्ट अधिकृत मार्गदर्शक सूचना जाहीर न झाल्यामुळे राज्यातील सुमारे दोन लाख शिक्षकांमध्ये अस्थिरता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, टीईटी सक्तीचा निर्णय मागे घेण्याची मागणी शिक्षकांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीबाबत शासन सकारात्मक विचार करून माहे ऑगस्ट, २०१० पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी अनिवार्य न करण्याबाबत निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) सिव्हील अपील क्र. १३८५/२०२५ या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०१.०९.२०२५ रोजी पारीत केलेल्या न्यायनिर्णयानुसार ज्या प्राथमिक शिक्षकांची सेवा ५ वर्षाहून अधिक काळ शिल्लक आहे, अशा शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. पदोन्नतीसाठी ५ वर्षाहून कमी काळ सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना देखील सदर परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सदर न्यायनिर्णयाच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या पुढील कार्यवाही संदर्भात केंद्र शासनाचे तसेच राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेचे मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. तथापि, सदर मार्गदर्शन अद्यापही अप्राप्त आहे. दरम्यान या प्रकरणी केंद्र शासनाने प्राथमिक शिक्षकांची मागितलेली सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. केंद्र शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर अधिकृत मार्गदर्शक सूचना जाहीर करण्याचा शासनाचा मानस होता. तथापि, यास विलंब होत असल्याने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शिक्षक गाफील राहू नयेत यासाठी मार्गदर्शनात्मक परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.
(३) व (४) टीईटी अनिवार्य करण्याबाबतचा निर्णय मागे घेण्यात यावा अशी मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे. यासंदर्भात राज्य शासनाचे अधिकार अतिशय मर्यादित स्वरुपाचे आहेत. पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यास विधि व न्याय विभागाने असहमती दर्शविल्यानंतर शालेय शिक्षण विभागाने स्वत:च्या जबाबदारीवर पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची तयारी दर्शविल्यानंतर विधि व न्याय विभागाने त्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुसार पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(८) * २४००६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील तसेच ग्रामीण भागातील गळक्या व मोडकळीस आलेल्या शाळांच्या दुरुस्तीसाठी संबंधित विभागामार्फत शाळांकडून प्रस्ताव मागविण्यात आल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२४ च्या शैक्षणिक वर्षात सुमारे ४५५ शाळांच्या दुरुस्तीसाठी अंदाजे रुपये २० कोटी इतक्या निधीची आवश्यकता असताना शासनाकडून केवळ रुपये ९ कोटी इतकाच निधी उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे अनेक शाळा मोडकळीस आल्या असून पावसाळ्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित शाळांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक अतिरिक्त निधीची तरतूद करून मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०२५-२६ च्या यु-डायस प्रणालीनुसार एकूण २४७३ प्राथमिक व उच्च प्रथमिक शाळा आहेत. त्यापैकी ४३५ वर्गखोल्या मोडकळीस नोंदविलेल्या आहेत. त्याकरिता अंदाजे एकूण रु.४३५०.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. तसेच दुरुस्ती कामांकरीता २४९ शाळा नोंदविलेल्या आहेत. त्याकरिता रु.२०८९.२४ लक्ष इतक्या अंदाजित निधीची आवश्यकता आहे.

सन २०२५-२६ मध्ये शासनाच्या विविध योजनांमधून ३३१ वर्गखोली दुरुस्ती कामे रक्कम २.१६२८.०० लक्ष तसेच नविन वर्गखोली बांधकामाकरीता २४ शाळांना रक्कम रु.५६२.७५ लक्ष निधीच्या प्रशासकीय मंजूरी प्राप्त असून कामे पूर्ण व प्रगतीपथावर आहे.

जिल्हा नियोजन समिती, मनरेगा, सेस निधी, क्रीडा विभाग निधी, स्थानिक विकास निधी, सेवाभावी संस्था, समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, सिएसआर, गौणखणिज, लोकसहभाग, जलजीवन मिशन, १४ वा / १५ वा वित्त आयोग इत्यादी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजनांव्दारे कार्यान्वित उपाययोजनांचा शासकीय, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील स्थानिक गरजानुसार अपेक्षित पायाभूत सुविधांच्या विकासाकरीता दिनांक १६.०४.२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सूचना देण्यात आल्या आहे. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १३/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जिल्हा नियोजन समितीच्या नियतव्य ५% निधी शालेय शिक्षणाशी संबंधित योजनासाठी कायम स्वरुपी राखीव ठेवण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नियमित प्राध्यापकांची पदे भरणेबाबत

**(९) * ३००२१ श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयांमधील ५ हजारांहून अधिक नियमित प्राध्यापक पदे ६० : ४० सूत्रानुसार भरण्याच्या नियमांमधील वारंवार बदलामुळे ठप्प झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भरती प्रक्रियेसंदर्भात दोन वेळा शासन निर्णयात बदल करण्यात आल्यानंतर मुलाखतीतील गुणसंख्या वाढविण्याबाबत तिसऱ्या सुधारित शासन निर्णयाची प्रतिक्षा असल्याने पात्र उमेदवारांना पुन्हा अर्ज सादर करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ५ हजारांहून अधिक पदे भरण्याबाबत कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील नियमित प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील अध्यापकांची पदभरती शासन निर्णय दिनांक ११.०२.२०२६ मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक संशोधनासाठी ६०%, अध्यापन कौशल्य मुल्यांकनासाठी २०% आणि मुलाखत कामगिरीसाठी २०% या सुधारित तरतुदीनुसार करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील अध्यापकांच्या ५,०१२ रिक्त पदांच्या पदभरतीस शासन निर्णय दिनांक ११.०२.२०२६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील अध्यापकांच्या रिक्त पदांच्या भरतीस शासन निर्णय दिनांक ११.०२.२०२६ नुसार पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

(३) विद्यापीठ व अशासकीय अनुदानित महाविद्यालयात अध्यापकांची पदे पुढील शैक्षणिक वर्षात भरण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

(४) राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील रिक्त पदांच्या पदभरतीची कार्यवाही शासन निर्णय दिनांक ११.२.२०२६ नुसार सुरू आहे.

तसेच, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील अध्यापकांच्या रिक्त पदांच्या पदभरतीस शासन निर्णय दिनांक ११.०२.२०२६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शारीरिक शिक्षण शिक्षक (क्रीडा) पद भरतीबाबत**

**(१०) * ३१७८२ श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक पात्रता व अभियोग्यता चाचणी (TAIT २०२५) चा निकाल जाहीर झालेला असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० राज्यात अंमलात आलेला आहे, सदर धोरणातील प्रकरण क्र. ७ नुसार जिल्हा परिषद केंद्रशाळांमध्ये शारीरिक शिक्षण शिक्षक (क्रीडा) नियुक्ती अनिवार्य असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय दिनांक १५ मार्च, २०२४ मधील मुद्दा क्र. ४.५ नुसार प्रत्येक २५० विद्यार्थ्यांमागे एक शारीरिक शिक्षण शिक्षक नेमण्याची तरतूद असताना राज्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय आश्रमशाळा व समाजकल्याण विभागाच्या शाळांमध्ये मागील सुमारे २० वर्षांपासून या पदांची नियमित भरती न झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात शारीरिक शिक्षण शिक्षकांची एकूण किती पदे मंजूर असून त्यापैकी किती पदे रिक्त आहेत त्याचा जिल्हानिहाय तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, B.P.Ed. व M.P.Ed. पदवीधारक पात्र उमेदवार मोठ्या संख्येने उपलब्ध असताना पवित्र पोर्टल अंतर्गत होणाऱ्या आगामी शिक्षक भरती प्रक्रियेत शारीरिक शिक्षण शिक्षक (क्रीडा) पदे केंद्रशाळा तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर पूर्ण क्षमतेने भरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शारीरिक शिक्षण विषयाला प्राधान्य देऊन रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये औपचारिक विषयांबरोबरच कला, क्रीडा, व्यवसाय शिक्षण इत्यादी विषयांच्या अध्यापनावर भर देण्यात आला आहे.

(२) दिनांक १५.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये संच मान्यतेचे सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये कला, क्रीडा व कार्यानुभव विषयांच्या विशेष शिक्षकांचा समावेश करण्यात आला आहे. जे नियुक्ती

प्राधिकारी पटसंख्येनुसार अशा विशेष शिक्षकांसाठी पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिध्द करतील, त्यांना शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी सन २०२५ मधील प्राप्त गुणांच्या आधारे विशेष शिक्षकांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात येईल.

(३) सन २०२५-२६ ची संच मान्यता प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून दिनांक १५.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये विहित संचमान्यता धोरणानुसार शाळानिहाय क्रीडा शिक्षक संवर्गातील पदांची नेमकी माहिती उपलब्ध होईल.

(४) संचमान्यतेच्या धोरणानुसार उपरोक्तप्रमाणे शाळांमध्ये क्रीडा शिक्षकांची भरती अनुज्ञेय आहे. जिल्हा परिषदेच्या केंद्र स्तरावर ०१ याप्रमाणे राज्यात केंद्रस्तरीय क्रीडा शिक्षक संवर्गातील ४८६० पदांचा समावेश आकृतिबंधात करण्यात आला आहे. या पदांची अर्हता व अन्य सेवाशर्ती निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) रिक्त पदे भरण्यासाठी वरीलप्रमाणे शासन कार्यवाही करीत आहे.

-----------------

## मराठवाडा विभागात घोषित केलेल्या जलसिंचन प्रकल्पांबाबत

**(११)** * **२७९९०   श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये दिनांक १६ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या दरम्यान बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंत्रीमंडळ बैठकीत मराठवाड्यातील दहा सिंचन प्रकल्प आणि त्यासाठी रुपये १३,६७७ कोटी इतक्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सिंचन प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त सिंचन प्रकल्प तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक १६.०९.२०२३ रोजी मा. मंत्रीमंडळ बैठक छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाली.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर मंत्रीमंडळ बैठकीत एकूण ११ प्रकल्पास प्रशासकीय मान्यता /सुधारित प्रशासकीय मान्यता / अधिक्य टिप्पणी मान्यता प्राप्त झाली असून त्यामध्ये उर्ध्व पेनगंगा प्रकल्प (७६५४.६३ कोटी), बाभळी मध्यम प्रकल्प (७७१.२ कोटी), उनकेश्वर उच्च पातळी बंधारा (२३२.७१ कोटी), पोटा उच्च पातळी बंधारा (२३७.२ कोटी), जोडपरळी उच्च पातळी बंधारा (२३६.५१ कोटी), ममदापुर उच्च पातळी बंधारा (२७१.८८ कोटी), पिंपळगाव कुटे उच्च पातळी बंधारा (२६६.२ कोटी), निम्न दुधना प्रकल्प (३०७०.५२ कोटी), जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ (अधिक्य) (५३६.६१ कोटी), वाकोद मध्यम प्रकल्प (२७५.०१ कोटी), अंबड प्रवाही वळण योजना (१०.३३ कोटी) या प्रकल्पांचा समावेश आहे. या ११ प्रकल्पांची एकूण किंमत रु.१३५६२.७२ कोटी इतकी आहे.

(३) सुप्रमा मिळाल्यानंतर रखडलेल्या कामांना गती मिळाली आहे. ११ प्रकल्पांपैकी उर्ध्व पेनगंगा मोठा प्रकल्प असून निधी उपलब्धतेनुसार प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. अंबड प्रवाही वळण योजना माहे जून, २०२८ पर्यंत, उर्वरित प्रकल्पांपैकी २- प्रकल्प (जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ (अधिक्य), वाकोद मध्यम प्रकल्प) माहे जून,

२०२६ पर्यंत, २ प्रकल्प (बाभळी, उनकेश्वर उच्च पातळी बंधारा) माहे जून, २०२७ पर्यंत, ४ प्रकल्प (पोटा उच्च पातळी बंधारा, जोडपरळी उच्च पातळी बंधारा, ममदापुर उच्च पातळी बंधारा, पिंपळगाव कुटे उच्च पातळी बंधारा माहे ऑक्टोबर, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच निम्न दुधना प्रकल्प धरणात सन २०१० पासून पाणी साठा करण्यात येत असून प्रकल्प सिंचन व्यवस्थापन विभागास हस्तांतरण करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) सदर सर्व सिंचन प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर असून निधी उपलब्धतेनुसार प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निळवंडे धरण प्रकल्पाच्या डावा व उजवा कालव्यांच्या (Canal) सुरक्षिततेसह स्थानिकांना मूलभूत सुविधा देण्याबाबत

**(१२) * ३१४३६ डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवंडे (जि.अहिल्यानगर) धरण प्रकल्पाच्या डावा व उजवा कालव्यांचे बांधकाम धुमाळवाडी, नवलेवाडी, म्हाळादेवी परिसर व निळवंडे परिसरातील गावांमधून करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालवे गावांच्या वस्तीमधून व शेजारील भागातून जात असल्यामुळे नागरिकांसाठी ये-जा करणे व सुरक्षेच्यादृष्टीने धोकादायक ठरत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कालव्यांच्या कडेला संरक्षण भिंत, रेलिंग, पूल, पादचारी मार्ग किंवा इतर सुरक्षात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निळवंडे कालव्याचा उद्देश केवळ सिंचनासाठी पाणीपुरवठा करणे एवढाच मर्यादित नसून स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व सोयीसाठी पूरक उपाययोजना करणे आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ज्या स्थानिक नागरिकांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या व ज्यांना या प्रकल्पामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत अशा बाधितांना मूलभूत सुविधा (रस्ते, सुरक्षित पूल, संरक्षण भिंत, प्रकाश योजना इ.) व सुरक्षात्मक उपाययोजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

स्थानिक नागरिकांच्या ये-जा व सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षक भिंत, रस्ता भराव इत्यादी करण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर मागण्या प्राप्त झालेल्या आहेत. निळवंडे प्रकल्पाच्या कालव्यांचा मुख्य उद्देश सिंचनासाठी पाणीपुरवठा करणे हा असला तरी स्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक त्या उपाययोजना प्रगतीपथावर आहेत.

म्हाळादेवी गावात डावा कालवा सा.क्र.३६६० मी. येथील रस्ता पुलाजवळ रेलिंगचे बांधकाम करण्यात आले असून सा.क्र. २२०० मी. ते २९०० मी. या भागात देखील कालव्यावरील सेवापथाच्या बाजूने रेलिंगचे बांधकाम प्रस्तावित आहे.

अकोले तालुक्यातील निळवंडे प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या कालव्याच्या एकूण ४४ किमी लांबीमध्ये एकूण ५८ काँक्रीटच्या रस्तापुलांची कामे पूर्ण करण्यात आली असून सदरची रस्तापूल पूले नागरीकांच्या सोयीसाठी खुले करण्यात आली आहेत. तसेच, ज्या ठिकाणी काँक्रीटचे रस्तापुल देणे शक्य नाही तेथे डावा

कालव्यावर २२ व उजव्या कालव्यावर १३ याप्रमाणे एकूण ३५ पादचारी लोखंडी पूल प्रस्तावित असून १७ पुलांचे काम पूर्ण झाले असून १८ पुलांचे काम प्रगतीपथावर आहे.

निळवंडे, चितळवेढे, निब्रळ, म्हाळादेवी, मेहंदुरी, कोकणेवाडी, कारवाडी, उंचखडक व ठाकूरवाडी या गावांमधील एकूण ११.०५ किमी लांबीचे रस्त्यांचे बांधकाम करण्यात आले असून, स्थानिकांना दळणवळणासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षेच्या पेपर फुटीबाबत

**(१३) * २६२५४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षेचा पेपर फुटीबाबतच्या प्रकरणात अद्यापपर्यंत २२ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये एका प्राध्यापकाचाही सहभाग आढळल्याची तसेच चौकशीस गेलेल्या पोलीस पथकास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आवश्यक गोपनीय माहिती देण्यास नकार देण्यात आल्याने परिषदेच्या कार्यप्रणालीबाबत संशय व्यक्त करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पोलिसांना तपासासाठी आवश्यक माहिती उपलब्ध न करून देण्यामागील कारणे काय असून संबंधित माहिती न पुरविणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शिक्षण सहसंचालकांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) शिक्षक पात्रता परीक्षा पेपर फुटीबाबतच्या तथाकथित प्रकरणाच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील मुरगूड पोलीस स्टेशन अंतर्गत गु.र.न. ३६१/२०२५ दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलीसांनी आतापर्यंत २९ आरोपी व १२ साक्षीदार निश्चित केले आहेत. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने दिनांक ०१.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे पोलीसांना स्वत:हून परीक्षेशी व परिक्षार्थींशी संबंधित सर्व तपशिल पुरविण्याची तयारी दर्शविली आहे.

(२) व (३) पेपर फुटीबाबत पोलीसांनी केलेल्या सखोल तपासणीत प्रश्नपत्रिकेची छपाई करणाऱ्या गोपनीय संस्थेबाबत अथवा विषय तज्ञांबाबत पोलीसांना कोणताही पुरावा आढळलेला नाही. तसेच परीक्षेशी संबंधित कोणतेही साहित्य देखील आढळून आलेले नाही. कोणत्याही पुराव्याशिवाय प्रश्नपत्रिकाची छपाई करणाऱ्या संस्थेचे नाव उघड करणे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या गोपनीय कामकाजाच्या दृष्टीने व्यवहार्य नाही. पोलीसांनी केलेल्या तपासात कोणत्याही प्रकारे परीक्षा घेण्याच्या प्रक्रीयेशी संबंधित कोणत्याही संस्थेचा अथवा व्यक्तीचा सहभाग आढळून आल्यास अशा संस्थांवर अथवा व्यक्तीवर संबंधित कायद्यातील तरतूदीनुसार कारवाई करण्यास शासनाचा आक्षेप असण्याचे कोणतेही कारण नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत बारावी बोर्ड परीक्षेमध्ये झालेल्या गैरप्रकाराबाबत

**(१४) * ३१३९७ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात गैरप्रकार करताना राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजीपासून सुरू झालेल्या बारावीच्या परीक्षेदरम्यान सुमारे २२ विद्यार्थ्यांना बडतर्फ (रस्टिकेट) करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षांमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

गैरमार्ग प्रकरणी विद्यार्थ्यांची विभागीय मंडळ स्तरावर चौकशी करण्यात येऊन चौकशीअंती विभागीय मंडळाच्या तदर्थ समितीच्या मान्यतेने दोषी आढळून येणाऱ्या विद्यार्थ्यांविरुध्द मंडळ शिक्षा सुचीनुसार कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत कोणत्याही विद्यार्थ्यांस प्रतिबंधित करण्यात आले नसून सदर विद्यार्थ्यांना उर्वरित परीक्षा देण्याबाबत कोणतेही निर्बंध घालण्यात आलेले नाहीत.

(२) फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या बोर्ड परीक्षांचे आयोजन गुणवत्तापूर्ण व सुरक्षित वातावरणात होण्यासाठी गतवर्षी प्रमाणे यावर्षी देखील राज्यात कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी साठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. ज्या शाळांमध्ये इयत्ता १२ वी व इयत्ता १० वी चे परीक्षाकेंद्र देण्यात आले आहेत, त्या शाळांमध्ये सीसीटीव्ही अनिवार्य करण्यात आले आहेत.

२. ज्या परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही नाहीत तेथील केद्र संचालक, पर्यवेक्षक, शिपाई व इतर कर्मचारी यांची अदलाबदल करण्यात आली आहे.

३. गैरप्रकरणांबाबत संवेदनशील असलेल्या परीक्षा केंद्रावर “बैठे पथक” नेमण्यात आले आहे.

४. प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे व दिनांक ९ जानेवारी, २०२६ च्या शासन निर्णयान्वये दक्षता समितीची जबाबदारी व कार्ये निश्चित करण्यात आली आहेत.

५. परीक्षा केंद्रावर अकस्मात भेटी देण्यासाठी भरारी पथके तयार करण्यात आली.

६. इयत्ता १२ वी व इयत्ता १० वी च्या बोर्ड परीक्षांदरम्यान गैरप्रकरणांमध्ये दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

७. अतिसंवेदशील केंद्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी अशा परीक्षा केंद्रांवर ड्रोन च्या माध्यमाने निगराणी ठेवण्यात येत आहे.

८. Maharashtra Prevention of Malpractices Act १९८२ या कायद्याची अंमलबजावणी करण्यासंबंधी व कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कॉमन एफ्लुइंट ट्रिटमेंट प्लान्ट (सीईटीपी) प्रकल्पास मान्यता मिळण्याबाबत**

**(१५) * २७३८० श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्र यंत्रमाग उद्योगाचे महत्त्वाचे केंद्र आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथे कॉमन एफ्लुइंट ट्रिटमेंट प्लान्ट (Common Effluent Treatment Plant) नसल्यामुळे सध्याचे यंत्रमाग व कापड उद्योगांमध्ये वाढ होण्यावर बंधने येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यंत्रमाग व कापड उद्योगामध्ये वाढ करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून येथे कॉमन एफ्लुइंट ट्रिटमेंट प्लान्टला (Common Effluent Treatment Plant) मान्यता मिळण्यासाठी रु.४.८ कोटी इतकी रक्कम सौर उर्जेवर आधारित वस्त्रोद्योग क्षेत्राच्या मदतीसाठी मंजूर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ही प्रक्रिया सध्या क्लिष्ट असल्यामुळे ही रक्कम वस्त्रोद्योग क्षेत्रातील कंपन्यांना मिळविणे कठीण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी कॉमन एफ्लुइंट ट्रिटमेंट प्लान्ट (सीईटीपी) प्रकल्पास मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणत्या उपयायोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे :** (१) हे खरे आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक विकास महामंडळाच्या कागल हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात वस्त्रोद्योगासाठी सन २००९ मध्ये १० दलली/दिन क्षमतेचा सीईटीपी बांधून कार्यान्वित करण्यात आलेला आहे. सदर सीईटीपी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकानुसार चालविण्यात येत आहे. सद्य:स्थिती सीईटीपी मध्ये साधारणत: ३ दलली/दिन प्रतिदिन सांडपाणी येत आहे.

(३), (४) व (५) शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०२३ अन्वये एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण सन २०२३-२८ जाहीर करण्यात आले असून सदर धोरणामध्ये शासन निर्णय दिनांक ०६/०३/२०२४ अन्वये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदर धोरणाअंतर्गत नवीन प्रकल्पांना संयुक्त सांडपाणी प्रक्रीया केंद्राच्या (Common Effluent Treatment Plant) उभारणीसाठी ५० टक्के किंवा ५ कोटी यापैकी जे कमी असेल तेवढे भांडवली अनुदान देण्यात येते. तसेच विद्यमान व नवीन वस्त्रोद्योग घटकांना सौर ऊर्जा प्रकल्पांच्या स्थापनेसाठी प्रकल्प किंमतीच्या २० टक्के किंवा ४.८ कोटी यापैकी जे कमी असेल तेवढे भांडवली अनुदान देण्यात येते. सदर भांडवली अनुदानासाठी वस्त्रोद्योग विभागाच्या ई-टेक्सटाईल प्रणालीवर अर्ज सादर करण्याची सुविधा देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनधिकृत खाजगी शिकवणी वर्गाकडून आकारल्या जाणाऱ्या अवाजवी शुल्काबाबत**

**(१६) * ३०७४१ श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक खाजगी क्लासेसना शासकीय मान्यता अथवा परवानगी नसतानाही विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा क्लासेसकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्कावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, अवाजवी शुल्क आकारणीस प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन यांनी दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ मुंबई यांचे आदेश, श्री. सुकदेब सहा यांनी दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे आदेश, केंद्र शासनाच्या उच्च श़िक्षण विभागाने माहे जानेवारी, २०२४ मध्ये खाजगी शिकवणी वर्गांकरीता जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना, आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रस्तावित केलेला कायद्याचा मसुदा तसेच अन्य राज्यातील खाजगी शिकवणी वर्गांकरीता केलेले कायदे/ नियमावली/ मार्गदर्शक सुचना विचारात घेण्यात येऊन राज्यातील खाजगी शिकवणी वर्गांची नोंदणी व विनियमन करण्याकरीता खाजगी शिकवणी नोंदणी व विनियमन अधिनियम २०२६ तयार करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या पीक कर्ज वसुलीच्या स्थगितीतून ठाणे जिल्हा वगळल्याबाबत

**(१७) * ३१२६५ श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अतिवृष्टीच्या संकटातून शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी राज्य शासनाने पीक कर्ज वसुलीला दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान काढलेल्या अध्यादेशानुसार स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्थगिती आदेशात २९ जिल्हयांतील २८२ तालुक्यांचा समावेश करण्यात आला असून त्यात २५१ पूर्णत: बाधित, ३१ तालुके अंशत: बाधित घोषित करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्हयात अतिवृष्टी होऊन भात पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असतानाही या पीक कर्जाच्या वसुलीच्या स्थगितीतून ठाणे जिल्हा वगळण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना पीक कर्जाचा भरणा तातडीने भरावा लागत असून त्यांना लाखो रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने ठाणे जिल्हयातील बाधित शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेता या पीक कर्ज वसुलीला स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

सन २०२५ मध्ये राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे सवलतीसाठी बाधित तालुके घोषित करण्याबाबत महसूल व वन विभागाने दिनांक १०.१०.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्यातील विविध तालुक्यांमध्ये माहे जून ते सप्टेंबर, २०२५ या कालावधीतील अतिवृष्टी व पूर, पेरणी खालील क्षेत्र व पिकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करुन या घटकांनी २५१ पूर्णत: व ३१ अंशत: प्रभावित झालेले तालुके आपत्तीग्रस्त म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या शासन निर्णयात ठाणे जिल्ह्याचा समावेश नाही.

(४) नाही.

ठाणे जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत खरीप २०२५ च्या हंगामातील वितरीत पीक कर्जाच्या परतफेडीस दिनांक ३०.०६.२०२६ पर्यंत कालावधी आहे. तसेच व्यापारी बँकांमार्फत वितरीत कर्जाच्या परतफेडीचा कालावधी कर्ज वितरणापासून एक वर्षाचा आहे. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची दिनांक २८.०२.२०२६ अखेरची अल्पमुदत पीक कर्जाची वसुली केवळ १५.१६ टक्के आहे. त्यामुळे पीक कर्जाची परतफेड तातडीने करावी लागत आहे, अशी वस्तुस्थिती नाही.

(५) महसूल व वन विभागाने दिनांक १०.१०.२०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये ठाणे जिल्ह्याचा आपत्तीग्रस्त जिल्हा म्हणून समावेश केल्यास शासन परिपत्रक दिनांक २६.११.२०२५ मध्ये नमूद केल्यानुसार या जिल्हयातील पीक कर्ज वसुलीस स्थगिती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**वज्रेश्वरी झोपडपट्टी दिंडोरी रोड, पंचवटी (जि.नाशिक) येथील झोपडपट्टी अधिकृत करण्याबाबत**

**(१८) * ३१८०० ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील डाव्या कालव्या नजीक वज्रेश्वरी झोपडपट्टी दिंडोरी रोड, पंचवटी येथे सन १९९५ पूर्वी पासून ८००० हून अधिक लोक वास्तव्य करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वास्तव्य करीत असलेल्या नागरीकांकडे शासनामार्फत दिलेले रेशन कार्ड, लाईट बिल तसेच मनपा, नाशिक यांना घरपट्टी तसेच पाणी पट्टी भरलेले सर्व दस्तऐवज उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांच्यावतीने शाखा अभियंता, सिंचन शाखा, नाशिक यांनी जा.क्र सिंचन शाखा, नाशिक/२२४/सन २०२५ दिनांक ०५/१२/२०२५ द्वारे वज्रेश्वरी झोपडपट्टी दिंडोरी रोड, पंचवटी येथील नागरिकांना तातडीने घरे खाली करण्याच्या नोटीसा दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणामुळे सदर वास्तव्यास असलेल्या लोकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होवून शासनाविषयी संताप निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वज्रेश्वरी झोपडपट्टी दिंडोरी रोड, पंचवटी येथील झोपडपट्टी अधिकृत करण्यासाठी किंवा पुनर्वसन योजना लागू करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी (नाशिक पूर्व) मा.मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे लाभक्षेत्र) तसेच अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग यांना दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, वज्रेश्वरी झोपडपट्टी दिंडोरी रोड, पंचवटी येथील झोपडपट्टीस अधिकृत झोपडपट्टी म्हणून मान्यता देऊन पुनर्वसन योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

अतिक्रमण धारकांना नाशिक महानगरपालिका, नाशिक व इतर विभागामार्फत पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा व इतर आवश्यक सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत, याबाबत जलसंपदा विभागामार्फत कोणतीही ना-हरकत अथवा परवानगी देण्यात आलेली नाही.

(३) हे खरे आहे.

जलसंपदा विभागाच्या "जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ अतिक्रमण निष्कासन" या राज्यस्तरीय कार्यक्रमांतर्गत विभागाच्या सर्व प्रकल्पांसाठी संपादित केलेल्या शासकीय जमिनी तसेच शासकीय वसाहतींमध्ये नियमबाह्य वास्तव्यास असलेले सेवानिवृत्त कर्मचारी व अनधिकृत अतिक्रमणधारक यांना प्रचलित नियमांनुसार निवासस्थाने रिक्त करण्याबाबत नोटिसा देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

अतिक्रमण धारकांना अनाधिकृत अतिक्रमणे काढण्याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. यानुषंगाने अतिक्रमण धारकांना क्षेत्रिय कार्यालयाकडून दिनांक २१.०७.२०११, दिनांक ०५.१२.२०२३ व दिनांक ०५.१२.२०२५ रोजी नोटीसा देण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे आहे.

नाशिक पूर्व मतदार संघातील वज्रेश्वरी झोपडपट्टी दिंडोरी रोड, पंचवटी येथील अतिक्रमण कारवाईला स्थगिती मिळणेबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक २८.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या कडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(६) जलसंपदा विभागाच्या प्रकल्पाकरिता संपादित जागेवर वसाहतीमधील अतिक्रमण धारकांना पर्यायी निवारा, पुनर्वसन, भूखंड किंवा घर उपलब्ध करुन देणे याबाबत जलसंपदा विभागाचे धोरण नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील पे युनिटमधील त्रुटींमुळे सेवानिवृत्त शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीची (PF) प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१९) * ३१७१६ श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील पे युनिटच्या निष्काळजीपणामुळे सेवानिवृत्त शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी (PF) लाभाची शेकडो प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीडीएस प्रणाली पूर्णतः ऑनलाईन असूनही वारंवार तांत्रिक अडचणी उद्‌भवत असल्यामुळे संबंधित प्रकरणे दीर्घकाळ ठप्प आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पीएफ प्रलंबित प्रकरणांबाबत कोणतीही लेखी माहिती, निश्चित कालमर्यादा किंवा पर्यायी कार्यपद्धतीत उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासनातील विलंबामुळे सेवानिवृत्त शिक्षकांमध्ये नाराजी पसरल्याचे तसेच पीएफ व पेन्शन लाभ प्राप्त होण्यासाठी दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ऑनलाईन बीडीएस प्रणाली प्रभावी न ठरल्यास पर्यायी ऑफलाईन व्यवस्था लागू करण्याबाबत शासन विचारधीन आहे काय,

(६) असल्यास, सदर सर्व प्रलंबित पीएफची प्रकरणे विहित मुदतीत मार्गी लावण्यासाठी तसेच शिक्षक संघटनांच्या मागण्यांच्या अनुषंगाने बीडीएस प्रणाली अधिक परिणामकारक करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्या अहवालानुसार, शालार्थ प्रणालीत तयार करण्यात आलेली ऑनलाईन देयके काही कालावधीकरिता तांत्रिक कारणास्तव सादर करण्यास अडचण होत होती. तद्नंतर महाआयटी मार्फत प्राप्त निदेशानुसार भविष्य निर्वाह निधीची सर्व देयके डिलीट करुन नव्याने शालार्थ प्रणालीमध्ये ऑनलाईन देयक तयार करुन प्राधिकारपत्रासह देयके कोषागार कार्यालयास सादर करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे अंशत: खरे आहे.

शालार्थ प्रणालीत तयार करण्यात आलेली ऑनलाईन देयके काही कालावधीकरिता तांत्रिक कारणास्तव सादर करण्यास अडचण होत होती.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सद्य:स्थितीत अधिक्षक, वेतन पथक, माध्यमिक यांचे स्तरावरुन शालार्थ प्रणालीमध्ये ऑनलाईन देयक तयार करुन प्राधिकारपत्रासह देयके कोषागार कार्यालयास सादर करण्यात येत आहेत.

-----------------

**चंद्रपूर जिल्हा परिषद शाळांमधील रिक्त पदांवर सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी नियुक्ती केल्याबाबत**

**(२०) * ३१९७९ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या शाळांतील रिक्त पदांवर डी.एड./बी.एड. पात्र बेरोजगार तरुणांना संधी न देता रु. २० हजार मानधनावर १४७ सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यात मोठ्या संख्येने डी.एड./बी.एड. पात्र बेरोजगार उपलब्ध असताना त्यांना डावलून सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्यामुळे शिक्षक संघटना व बेरोजगारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्णयामुळे पात्र बेरोजगार युवक वंचित राहत असून शिक्षण व्यवस्थेत नव्या पिढीच्या सहभागाला मर्यादा येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी नियुक्ती पुनर्विचारार्थ घेऊन रिक्त पदांवर डी.एड./बी.एड. पात्र बेरोजगार युवकांना संधी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून पवित्र पोर्टलमार्फत नियमित शिक्षक नियुक्त होईपर्यंत सेवानिवृत्त शिक्षकांची मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेबाबत विभागाचे धोरण आहे. यानुसार चंद्रपूर जिल्ह्यामध्ये १४७ सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती ही तात्पुरत्या कालावधीकरीता करण्यात आलेली आहे.

(२) कंत्राटी तत्वावर सेवानिवृत्त शिक्षकांऐवजी डी.एड/बी.एड बेरोजगार उमेदवारांची नियुक्ती करणेबाबतच्या मागणीबाबतची निवेदने लोकप्रतिनिधी व शिक्षक संघटना यांचेकडून प्राप्त होत आहेत.
(३) व (४) राज्यात पवित्र प्रणालीमार्फत पारदर्शकपणे शिक्षक पदभरतीबाबतची प्रक्रिया पार पाडली जाते. राज्यातील सर्व शाळांमध्ये कायमस्वरुपी नियुक्ती शिक्षक नेमण्याचा शासनाचा मानस आहे. सदरची पदे पवित्र पोर्टलमार्फत भरेपर्यंत शाळांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव एक तात्पुरती व्यवस्था म्हणून सेवानिवृत्त शिक्षकांची मानधन तत्वावर नियुक्ती केली जाते. नियमित शिक्षक नियुक्ती झाल्यानंतर त्यांची तात्पुरती सेवा समाप्त होणार आहे.

राज्यातील डीएड/बीएड पात्र उमेदवारांमधून पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक भरतीची प्रक्रिया नियमितपणे राबविण्यात येत आहे. सन २०१७ च्या परीक्षेच्या आधारे जवळपासन ९,२१४ तर सन २०२२ च्या परीक्षेच्या आधारे सुमारे २३,८७१ उमेदवारांची नियुक्तीकरीता शिफारस करण्यात आली आहे.

शिक्षक नियुक्तीत खंड पडू नये म्हणून शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याद्वारे शिक्षक पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व रिक्त शिक्षकीय पदे कायमस्वरुपी भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.

-----------------

## सांगली व कोल्हापूर जिल्ह्याचे महापुरापासून संरक्षण करण्यासाठी "फ्लड डायव्हर्शन" प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत

**(२१) * ३१५६१ श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली व कोल्हापूर शहरांचे महापुरापासून कायमस्वरूपी संरक्षण करण्यासाठी 'फ्लड डायव्हर्शन' (Flood Diversion) प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप संथ गतीने सुरू असून त्यामुळे महापुराच्या काळात मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात आहे तर दुसरीकडे दुष्काळी भागात पाणीटंचाईची तीव्र समस्या कायम आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प दोन टप्प्यांत पूर्ण होणार असून त्यावर एकूण रु. ४ हजार कोटी इतका खर्च अपेक्षित आहे तसेच प्रकल्पाचा पहिला टप्पा लवकरच सुरू होणार असून त्यासाठी रु.५११ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे, मात्र वितरित झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दरवर्षी येणाऱ्या महापुरामुळे सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांत होणारी कोटयवधी रुपयांची हानी टाळण्यासाठी या प्रकल्पाची तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यास विलंब होत असल्यामुळे प्रकल्पाचा खर्च वाढत असून नागरिकांना दरवर्षी पुराच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महापुराच्या पाण्याचे नियोजन युद्धपातळीवर करून दुष्काळी भागाला दिलासा देण्यासाठी शासन या प्रकल्पाच्या कामात प्रशासकीय सुधारणा किंवा विशेष निधीची तरतूद केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकल्पाच्या सध्याच्या प्रगतीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), दिनांक १३.०३.२०२४ अन्वये जागतिक बँकेच्या सहाय्याने रू. ३२०० कोटीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) राबविण्याचा निर्णय घेण्यात

आला आहे. यामध्ये जलसंपदा विभागाचा हिस्सा रू. १६८० कोटी एवढा आहे. या प्रकल्पासाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातच रू.१७५.५० कोटी व सन २०२६-२७ साठी रू.१००.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित केली असून सदर प्रकल्पासाठीची निविदा प्रकिया प्रगतिपथावर आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम प्रकल्पांतर्गत (MRDP) पुरनियंत्रण उपाययोजनांच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण, अन्वेषण व प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामाची तांत्रिक सल्लागाराची (TRACTEBEL & XPLORER) निविदा निश्चित करण्यात आली आहे. सर्वेक्षणाची कार्यवाही पूर्ण झाली आहे. जलशास्त्रीय अभ्यास व पूर उपाययोजनांचा अभ्यास अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर अहवाल अंतिम झाल्यानंतर प्रस्तावित उपाययोजना कामांची संकल्पन, अंदाजपत्रके व प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) या प्रकल्पासाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात रू.१७५.५० कोटी व सन २०२६-२७ साठी रू. १००.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित केली असून सदर प्रकल्पासाठीची निविदा प्रकिया प्रगतिपथावर आहे.

(५) MRDP अंतर्गत प्रस्तावित कामांचे सर्वेक्षण, संकल्पन व प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचेमार्फत काम प्रगतीत आहे. त्यामुळे शासनाने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) राबविण्याकरिता शासनाने सुकाणू समिती (Steering Committee) स्थापन केली आहे. प्रकल्पाच्या संनियंत्रणासाठी MITRA या संस्थेस प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) म्हणून नियुक्त करण्यात आलेले असून या संस्थेमार्फत संपूर्ण प्रकल्पाचे संनियंत्रण केले जात आहे. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मदत व पुनर्वसन व महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) म्हणून नेमले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर या महामंडळातील कंत्राटदारांना पाच कामांची मर्यादा निश्चित केल्याबाबत

**(२२) * २९४६९ श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या अन्य महामंडळात नसलेली फक्त पाच कामांची अट विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळात कंत्राटदारांना लागू करण्यात आल्याने स्थानिक कंत्राटदारांनी या विरोधात कार्यवाही करण्याचे शासनास सुचविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर या महामंडळात कंत्राटदारांना फक्त पाच कामे देण्यात यावी अशी अट लागू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर लोकप्रतिनिधींनी दिनांक १० जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदय यांना अवगत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अटीमुळे स्थानिक कंत्राटदार डावलला जाऊन बाहेरील कंत्राटदारांना विकास कामे मिळण्याचा धोका वर्तविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर अट रद्द करण्याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ७२ व्या बैठकीमध्ये मंजूर ठरावाच्या अनुषंगाने महामंडळाच्या दिनांक ०५.०३.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये "एका कंत्राटदाराच्या नावे किंवा संयुक्त अभियानाव्दारे स्थापित अभिकरणाकडे (Joint Venture Consortium) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळात जास्तीत जास्त ५ कामे घेता येतील" असे नमूद आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) सदर प्रकरणी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या दिनांक ०५.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये ५ कामांची मर्यादा असलेला निर्णय शिथील करण्याच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विद्यार्थी आत्महत्या रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत**

**(२३) * ३१४९१ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य हे विद्यार्थी आत्महत्येच्या प्रमाणात देशात अग्रस्थानी असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार राज्यातील २ हजार ४६ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाळा/महाविद्यालय स्तरावर अपमानास्पद वागणूक, मित्रांपुढे खच्चीकरण, नापास होण्याची भीती, शाळेतून काढून टाकण्याची धमकी, विद्यार्थ्यांमधील तुलना अथवा फी न भरल्यामुळे वेगळे वागविणे इत्यादी कारणांमुळे विद्यार्थी आत्महत्यांचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थी आत्महत्या रोखण्यासाठी समुपदेशन व्यवस्था बळकट करणे, शाळांसाठी आचारसंहिता लागू करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य योग्य राहावे याकरिता "समुपदेशक" यांचे राज्यस्तरीय प्रशिक्षण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे मार्फत राज्य स्तरावरून घेण्यात येते व या तज्ञांमार्फत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत जिल्हा व तालुकास्तर याप्रमाणे शिक्षकांच्या सक्षमीकरणासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. तसेच, दिनांक २५ ते २७ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत तज्ञ संस्थेमार्फत विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना परीक्षा व त्यानंतरचा निकाल यामुळे येणाऱ्या ताण तणावाच्या निवारणासाठी सहाय्य करण्यास तीन ऑनलाईन सत्र आयोजित करण्यात आले होते. त्याचे व्हिडीओ राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या यु-ट्यूब चॅनलवर उपलब्ध आहेत.

तसेच, दिनांक ४ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने देशातील विद्यार्थ्यांवरील ताणतणाव कमी करण्याच्या अनुषंगाने पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याकरिता उपाययोजना सुचविण्यासाठी संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून सदर समितीमार्फत आपला अहवाल शासनास तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर आणि डिझाइन या अभिमत विद्यापीठास निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२४) * ३१४३९ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर आणि डिझाइन या संस्थेला माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये 'डी-नोव्हो' (अभिमत विद्यापीठ) दर्जा प्रदान करण्यात आल्यानंतरही माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये शासनाकडून आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील तीन वर्षांपासून पूर्णवेळ कुलगुरू नियुक्त नसल्याच्या कारणास्तव संस्थेचा निधी रोखण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, आता पूर्णवेळ कुलगुरू नियुक्ती, परिनियम (Statutes) मंजुरी व नियामक मंडळाची प्रक्रिया पूर्ण झालेली असतानाही चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात अपेक्षित रु.५० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधीअभावी संस्थेचा दैनंदिन व शैक्षणिक कारभार प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या शुल्कावर व सीएसआर निधीवर अवलंबून आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर ऐतिहासिक व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संस्थेच्या संवर्धनासाठी तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी चालू आर्थिक वर्षात विशेष निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) ते (५) हे खरे नाही.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे रु. ६.९९ कोटी तसेच २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पात ७ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर आणि डिझाइन (डी-नोव्हो प्रकारांतर्गत अभिमत विद्यापीठ) या संस्थेकडे पुरेसा निधी उपलब्ध राहिल याची दक्षता घेण्यात आली आहे.

-----------------

### राज्यातील अनेक शाळांमध्ये बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे शिक्षक भरती झाल्याबाबत

**(२५) * २४०२७ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शाळांमध्ये बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे हजारो शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याचे तसेच संबंधित प्रकरणांमध्ये काही संस्था चालक व अधिकाऱ्यांकडून आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथे काही अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, चंद्रपूर जिल्ह्यातील एका नामांकित शिक्षण संस्थेमार्फत नियमबाह्य पद्धतीने शिक्षक भरती झाल्याबाबत माजी लोकप्रतिनिधी (श्री.ना.गो.गाणार) यांनी मा.मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांच्याकडे लेखी तक्रार सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) नागपूर विभागातील बनावट कागदपत्रांच्या आधारे नियमबाह्यरित्या शालार्थ प्रणालीमध्ये शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नावे समाविष्ट करून वेतन अदा केल्याची बाब माहे मार्च-एप्रिल, २०२५ च्या दरम्यान उघडकीस आली होती. त्यानुषंगाने याप्रकरणी सायबर पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे गु.र.क्रं.२४/२०२५, दिनांक १२.०३.२०२५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासानुसार शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस विभागाकडून अटकेची कारवाई करण्यात आली होती. त्यानुसार संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना त्या-त्यावेळी शासन सेवेतून निलंबित करण्यात आले असून, त्यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू आहे.

सदर अनियमिततेच्या अनुषंगाने शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. चौकशी समितीने दिनांक ३१.१२.२०२५ च्या पत्रान्वये अंतिम अहवाल सादर केला असून त्यामधील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

तसेच राज्यातील सन २०१२ ते २०२५ या कालावधीमध्ये झालेल्या सर्व अनियमिततांची चौकशी करण्याकरीता शासन निर्णय दिनांक ०७.०८.२०२५ अन्वये राज्य स्तरावर विशेष तपास पथक गठीत करण्यात आले असून चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

### कर्नाटक राज्यातील अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटरमुळे निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीबाबत

**(२६) * २८०२६ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक राज्यातील अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटर पाण्यामुळे कोल्हापूर आणि सांगली परिसरामध्ये महापुराची परिस्थिती निर्माण होणार असल्याने जिल्ह्यातील शेकडो नागरिकांनी दिनांक १८ मे, २०२५ रोजी वा त्या दरम्यान अंकली नाक्यावर (जि.कोल्हापूर) चक्काजाम करुन आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने सदर धरणाच्या पाण्यामुळे कोल्हापूर व सांगली परिसरातील महापुरामुळे होणारी जिवीत तथा वित्त हानी रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

अलमट्टी धरण उंची वाढ विरोधात सांगली-कोल्हापूर रोडवर अंकली पुलानजीक दिनांक १८/०५/२०२५ रोजी अलमट्टी धरणाची उंची वाढ विरोधात सर्व पक्षीय संघर्ष समिती यांचे मार्फत चक्काजाम आंदोलन करण्यात आले होते.
(२) याबाबत मा.मंत्री, जलसंपदा (कृष्णा व गोदावरी खोरे विकास महामंडळ) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/०५/२०२५ रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, दिनांक ३१/०५/२०२५ रोजी सिंचन भवन, कोल्हापूर येथे अलमट्टी धरण उंची वाढ विरोधी संघर्ष समिती समवेत बैठक घेण्यात आली आहे.
(३) अलमट्टी धरणाच्या साठ्याचा (R.L. ५१९.६० व R.L. ५२४.२५६ पर्यंत) महाराष्ट्रावर होणारा परिणामाबाबत फेर अभ्यास करण्यासाठी National Institute of Hydrology, Roorkee येथील शास्त्रज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे. अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटरच्या परिणामाबाबत तसेच पुरपरिस्थितीबाबत अभ्यास अहवाल अंतिम होईपर्यंत उंचीवाढीचा निर्णय न घेण्याबाबत मा. मुख्यमंत्री, कर्नाटक राज्य यांना मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावर दिनांक ०९/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच मा. केंद्रीय मंत्री, जलशक्ती मंत्रालय यांना मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावर दिनांक २९/०७/२०२५ अन्वये पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांनी सर्वपक्षीय आमदार व खासदार यांचेसमवेत केंद्रिय मंत्री जलशक्ती मंत्रालय यांची दिनांक ०४/०८/२०२५ रोजी भेट घेऊन अलमट्टी धरण उंची वाढीबाबत चर्चा केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील नद्यांवरील बंधाऱ्यांच्या दुरवस्थेबाबत

**(२७) * २७४४६ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात पंचगंगा (भोगावती, तुळशी, कुंभी, कासारी आणि धामणी) तसेच वारणा, दूधगंगा, हिरण्यकेशी आणि कृष्णा या प्रमुख नद्या असून यावर मोठे, मध्यम आणि लहान असे सुमारे ७३ जलसाठा प्रकल्प (बंधारे) आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बहुतांश दगडी बंधारे कमकुवत झाल्याने बंधाऱ्यांमधून प्रचंड प्रमाणात पाण्याची गळती होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे अनेक गावात पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील सदर नद्यांवरील बंधाऱ्यांचे नुतनीकरण व दुरुस्तीसाठी शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयात ४ मोठे, १२ मध्यम व ५७ लघु असे एकूण ७३ प्रकल्प आहेत. तसेच एकूण ३०८ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

को.प.बंधाऱ्यांचे बांधकाम हे ६० ते ७० वर्षापूर्वी झाले असल्याने काही बंधारे कमकुवत झाले असून ८९ बंधाऱ्यांमधून गळती होत आहे.

(३) हे खरे नाही.

मोठे व मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांतर्गत असलेले को.प.बंधारे हे साखळी पध्दतीचे असल्यामुळे प्रकल्पांमधील उपलब्ध पाणी साठयानुसार पाणी को.प.बंधाऱ्यांमध्ये सोडण्यात येऊन सिंचनासाठी व पिण्यासाठी पाणी पुरवठा केला जातो.

धरणातून पाणी सोडल्यानंतर को.प.बंधाऱ्यांमध्ये बर्गे (Needles) घालून पाणी अडवले जाते व पाणी पातळी योग्य प्रमाणात राखली जात असून पाणी टंचाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) गळती असलेल्या ८९ को.प बंधाऱ्यांपैकी ८५ को.प बंधाऱ्यांची दुरुस्तीची कामे बिगर सिंचन प्रापणसूची, महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम व विशेष दुरुस्ती अंतर्गत मंजूर असून उर्वरित ४ को.प. बंधाऱ्यांची दुरुस्ती कामे हाती घेण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कापूस, सोयाबीन व मक्याच्या दर घसरणीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(२८)** * **३१७२५ श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील शेतमाल बाजारपेठ अतिसंवेदनशील असून गेल्या काही आठवड्यात कापूस आणि सोयाबीनचे दर एमएसपी (MSP) पेक्षा खाली घसरले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कापसाचे सरासरी दर रुपये ८,३०० क्विंटलवरून रुपये ७,७०० क्विंटलपर्यंत उतरले आणि सोयाबीनचे दर रुपये ५,७०० क्विंटलवरून रुपये ४,८५० क्विंटलपर्यंत खाली आले आहेत या दर घसरणीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भारत-अमेरिका ट्रेड डीलमुळे आणि शासनाने एमएसपी (MSP) दरावर त्वरित खरेदी न करण्याच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना झालेल्या आर्थिक नुकसानाची माहिती घेण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदर शेतकऱ्यांना होणाऱ्या आर्थिक नुकसानाची भरपाई किंवा संरक्षण करण्यासाठी तसेच कापूस, सोयाबीन व मक्याच्या दर घसरणीमुळे उत्पादन खर्च आणि कर्ज फेडीवर होणाऱ्या परिणामांवर शासनाने संपूर्ण आर्थिक मदत योजना लागू करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) भारतीय कपास निगम लि. (सी.सी.आय.) ने किमान आधारभूत किंमत दराने राज्यात दिनांक १५.१०.२०२५ पासून ते दिनांक ११.०३.२०२६ पर्यंत ६,३१,८९२ शेतकऱ्यांकडून रूपये १०,५९६.२९ कोटी किंमतीचा एकूण १३३.३३ लाख क्विंटल कापूस खरेदी केला आहे.

राष्ट्रीय कृषि सहकारी विपणन महासंघ लि. (नाफेड) व राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ मर्यादित (एन.सी.सी.एफ.) ने किमान आधारभूत किंमत दराने राज्यात सोयाबीन खरेदी कालावधी दिनांक १५.११.२०२५ ते दिनांक १२.०२.२०२६ मध्ये २,३८,९१६ शेतकऱ्यांकडून एकूण ६.०२ लाख मे.टन सोयाबीनची खरेदी केली आहे.

(३) सद्य:स्थितीत राज्यात सी.सी.आय. मार्फत १६८ खरेदी केंद्रांद्वारे किमान आधारभूत किंमत दराने कापूस खरेदी सुरू आहे.

नाफेड व एन.सी.सी.एफ. ने राज्यात किमान आधारभूत किंमत दराने दिनांक १५.११.२०२५ ते दिनांक १२.०२.२०२६ पर्यंत सोयाबीन खरेदी केली आहे.

(४) शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये व त्यांना संरक्षण मिळावे यासाठी केंद्र शासनाने पणन हंगाम २०२५-२६ मध्ये कापूस, सोयाबीन व मका खरेदीसाठी किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत हमीभाव घोषित केला आहे.

कापूस हंगाम २०२५-२६ साठी सी.सी.आय. ने जास्तीत जास्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी राज्यात एकूण १६८ कापूस खरेदी केंद्रे सुरू केली असून त्यापैकी एकूण १६२ खरेदी केंद्रांवर कापूस खरेदी सुरु आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून राज्य शासनाने केंद्र शासनास कापूस खरेदीस मुदतवाढ देण्याची विनंती केली होती. त्यानुसार केंद्र शासनाने दिनांक १५.०३.२०२६ पर्यंत कापूस खरेदीस मुदतवाढ दिली आहे. कापूस खरेदीस दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याची केंद्र शासनास दिनांक १३.०३.२०२६ च्या पत्रान्वये पुनश्च: विनंती करण्यात आली आहे.

सोयाबीन हंगाम २०२५-२६ साठी नाफेड व एन.सी.सी.एफ. ने राज्यात एकूण ९३४ सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू केली आहेत. सोयाबीन हंगाम २०२५-२६ करिता केंद्र शासनाच्या किमान आधारभूत खरेदी योजने अंतर्गत राज्यात सोयाबीन खरेदीसाठी दिनांक ३०.१०.२०२५ पासून शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व दिनांक १५.११.२०२५ पासून प्रत्यक्ष खरेदी सुरू करण्यात आली. खरेदीचा ९० दिवसांचा कालावधी दिनांक १२.०२.२०२६ पर्यंत होता. सोयाबीन हंगाम २०२५-२६ मध्ये सोयाबीन खरेदीकरीता ०१ महिन्याची मुदतवाढ देण्याची दिनांक २४.०२.२०२६ च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

पणन हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत केंद्र शासनाने मका साठी रुपये २४००/- प्रति क्विंटल किमान आधारभूत किंमत निश्चित केली आहे. पणन हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत दिनांक ०५.०३.२०२६ अखेर राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये ६०,०३५ शेतकऱ्यांनी शासनाकडे मका विक्री करण्यासाठी नोंदणी केली असून या १६ जिल्ह्यांमध्ये एकूण २३५ मका खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांनी किमान आधारभूत किंमत दराने राज्यातील १६ पैकी १४ जिल्ह्यांमध्ये दिनांक १२.०३.२०२६ पर्यंत १५,६११ शेतकऱ्यांकडून एकूण ६,५१,०९४ क्विंटल मका खरेदी केला आहे. राज्य शासनाकडून मका खरेदीचे उद्दिष्ट व मुदत वाढवून देण्यासाठी केंद्र शासनाकडे विनंती करण्यात आली होती. त्यानुसार केंद्र शासनाकडून मूळ मंजूर ६,६०,००० क्विंटल मका खरेदी उद्दिष्टाव्यतिरिक्त अतिरीक्त ५,००,००० क्विंटल मका खरेदीचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. तसेच खरेदी करण्यासाठी अंतिम मुदत दिनांक ३१.०३.२०२६ पर्यंत वाढवून दिली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई-पुण्यात डिजिटल फसवणूक व क्रेडिट कार्डबाबतच्या तक्रारींबाबत**

**(२९) * ३१४९२ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुण्यात डिजिटल फसवणूक व क्रेडिट कार्डबाबत तसेच कर्ज व्यवहार व थकबाकी वसुलीबाबत तक्रारी वाढल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय रिझर्व्ह बँकेकडे (आरबीआय) बँकेविरुध्दच्या तक्रारींमध्ये ४२ टक्के वाढ झाल्याचे आरबीआयच्या अहवालातून माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ग्राहकांच्या तक्रारींचा ओघ दिवसेंदिवस झपाटयाने वाढत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग यांच्या कार्यकक्षेत एकूण ४२ नागरी सहकारी बँका आहेत. तसेच विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग यांच्या कार्यकक्षेत एकूण ४३ नागरी सहकारी बँका आहेत.

सदर बँकासंदर्भात डिजिटल व क्रेडिट कार्डबाबत तसेच कर्ज व्यवहार व थकबाकी वसुलीबाबतची कोणतीही तक्रार सदर कार्यालयांकडे प्राप्त झालेली नाही.

(२) याबाबतची माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेकडून घेण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) नागरी सहकारी बँकामार्फत डिजिटल व क्रेडिट कार्डबाबत तसेच कर्ज व्यवहार व थकबाकी वसुलीबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.